**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत क्रिडांगणाची कामे घेण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन

शासन निर्णय क्रमांक : मग्रारो-२०१३/प्र.क्र.४९/रोहयो-१
नियोजन विभाग (रोहयो प्रभाग)
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ३० एप्रिल, २०१३

वाचा : १. मग्रारोहयो अधिनियम सन २००५
२. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना दिनांक ४ मे, २०१२
३. शासन परिपत्रक क्र. मग्रारोहयो-२०१२/प्र.क्र.३६/रोहयो-१ दिनांक ०९.१०.२०१२
४. केंद्र शासन अधिसूचना दिनांक २१ ऑक्टोबर, २०११
५. केंद्र शासन अधिसूचना दिनांक १४ जानेवारी, २०१३
६. केंद्र शासनाचे पत्र क्र. एल-१२०५५/१/०७/नरेगा दिनांक ११.०२.२०१३

**प्रस्तावना :**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा मूलभूत उद्देश ग्रामीण कुटुंबातील प्रौढ व्यक्तींना अकुशल कामाची मागणी केल्यानंतर कामे उपलब्ध करुन देणे आहे. त्याचबरोबर कायम स्वरुपी मालमत्ता निर्माण करुन सामाजिक पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे हा ही या योजनेचा उद्देश आहे. केंद्र शासनाने याकरिता महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कायदा २००५ पारीत केला. सदर कायद्याच्या कलम ४ (३) अंतर्गत अनुसूची (१) मध्ये योजनांतर्गत अनुज्ञेय कामांची यादी दिलेली आहे.

२. यापूर्वीच्या दिनांक २१ ऑक्टोबर, २०११ च्या उपरोक्त केंद्र शासनाच्या अधिसूचनेनुसार एकात्मीकृत कृती आराखडयामध्ये गोंदिया व गडचिरोली या दोन जिल्हयांमध्ये क्रिडांगणाची कामे अनुज्ञेय होती.आता दिनांक १४ जानेवारी,२०१३ च्या अधिसूचनेनुसार केंद्र शासनाने अनुसूची-१ मधील परिच्छेद क्रमांक १ (ब) मध्ये (१५ ए) नंतर (१५बी) चा अंतर्भाव केला असून राज्यभरात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमार्फत क्रिडांगणाची कामे अनुज्ञेय केली आहेत. तसेच केंद्र शासनाने दिनांक ११ फेब्रुवारी, २०१३ च्या पत्रान्वये याबाबत मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. तद्नुसार शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे :-

**शासन निर्णय :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत राज्यात क्रिडांगणाची कामे घेण्यास शासन मान्यता देत आहे. त्याबाबतची मार्गदर्शक तत्वे पुढीलप्रमाणे आहेत :-

**अ) निकष :-**

१) युवक कल्याण व क्रिडा मंत्रालय, भारत सरकारतर्फे राबविल्या जाणा-या पंचायत युवा क्रिडा व खेल अभियान (पायका) योजनेअंतर्गत फुटबॉल, व्हॉलिबॉल, हॉकी, कबड्डी, यासारख्या खेळांसाठी यथोचित आकारमानाच्या निकषाला धरुनच क्रिडांगणाची कामे घेण्यात यावीत.

२) युवक कल्याण व क्रिडा मंत्रालयाच्या पायका योजनेच्या निर्धारित सूचनेनुसार क्रिडांगणाची कामे विकसित केली पाहिजेत.

३) क्रिडांगणाच्या कामाच्या मुल्यांनुसार राज्य शासनाच्या सोयीने पायका योजना किंवा दुस-या योजनेशी अभिसरणाद्वारे क्रिडांगणाची कामे आवश्यकतेप्रमाणे घेता येतील.

४) क्रिडांगणाचे काम हे वैशिष्ठपुर्ण असल्यामुळे क्रिडा विभागाचे प्रचलित धोरण व मार्गदर्शक तत्वानुसार क्रिडांगणाची कामे करण्यात यावीत.

५) एका गावात फक्त एकच क्रिडांगण अनुज्ञेय असेल.

**ब) कार्यप्रणाली**

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या सर्व अटी व शर्तींना अनुसरुन क्रिडांगणे बांधण्याची कामे घेतांना खालील अटीं व शर्तींचे पालन करणे अनिवार्य राहिल :-**

१) क्रीडांगणाच्या कामाकरीता ग्रामसभेचा ठराव व शिफारस आवश्यक. तसेच वार्षिक कृती आराखडा व लेबर बजेटमध्ये कामाचा समावेश आहे याची खात्री करावी.

२) सदर कामासाठी तांत्रिक मान्यता क्रीडा विभागाच्या जिल्हा स्तरावरील तांत्रिक अधिकाऱ्यांनी द्यावा. तसेच प्रशसकीय मान्यता तहसिलदार किंवा गट विकास अधिकारी यांनी द्यावी.

**क) अंदाजपत्रक**

१) ग्रामपंचायतीच्या मान्यतेनंतर संबंधित तांत्रिक अधिकारी क्रिडांगणासाठी संकल्पचित्रे/ आरेखनासह अंदाजपत्रक तयार करतील व असे करतांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेसाठी निश्चित केलेल्या कामाप्रमाणे मजुरीचे दरपत्रक विचारात घेण्यात यावे.

२) अंदाजपत्रकामध्ये क्रिडांगणाचे सपाटीकरण करण्यासाठी खोदकाम व भरावाचे काम परस्पर पूरक प्रमाणात असावे जेणेकरुन खोदकाम व भरावाचे काम समप्रमाणात राहील. मजुरीच्या दरपत्रकात अनुज्ञेय असणा-या कमाल Lead मर्यादेत भरावाचे काम असेल तर केवळ खोदकामासाठी अंदाजपत्रकाप्रमाणे आकार लागू होईल. अन्यथा कमाल लिड च्या मर्यादेबाहेर वहनाचे काम असेल तर केवळ त्यासाठीच वहन आकार देय ठरेल.

३) या प्रकरणी तांत्रिक मान्यता शासन विहित अटींच्या अधीन राहून व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेसाठी प्रदान केलेल्या शक्तींच्या मर्यादेत देण्यात यावी.

**ड) अनिवार्य बाबी**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत खेळाच्या मैदानाच्या कामाकरिता केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रकान्वये विहित केलेल्या बाबींशिवाय खालील बाबी अनिवार्य आहेत:-

१) अकुशल कामासाठी नोंदणीकृत जॉबकार्डधारक मजुरांमार्फत काम करुन घ्यावे (जॉबकार्डवर नोंद घेणे अनिवार्य) ग्रामपंचायतीने इतर अपूर्ण कामे प्राधान्याने पूर्ण करावीत.

२) स्थानिक नोंदणीकृत मजुरांना मागणीनुसार काम उपलब्ध करुन द्यावे, हजेरीपट ठेवावे, बँक व पोष्टाद्वारे मजुरीचे प्रदान करणे, इ. कार्यपध्दतीचा अवलंब करावा.

३) कंत्राटदार, ठेकेदारांना तसेच मजूर विस्थापित करणाऱ्या यंत्रसामुग्रीस बंदी राहील.

४) क्रिडांगणाची कामे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत घेण्यात येणारी कामे ग्रामपंचायतीमार्फत करण्यात येत असल्यास ग्रामपंचायत स्तरावर मजुरी व साहित्याचे प्रमाण ६० : ४० च्या मर्यादेत ठेवावे व ही कामे यंत्रणेद्वारे करण्यात येत असल्यास मजुरी व साहित्याचे ६० : ४० प्रमाण तालुका स्तरावर राखणे अनिवार्य राहील.

**इ) उपरोक्त कामे घेताना सर्वतोपरी पारदर्शकतेचा अवलंब करण्यात यावा. पारदर्शकतेच्या बाबी प्रामुख्याने खालीलप्रमाणे राहतील:-**

१) कामाचे ठिकाणी फलक लावण्यात यावा. त्यावर कामाच्या एकूण खर्चाचा तपशील नमूद करण्यात यावा.

२) जॉबकार्डबाबत दिलेल्या सुधारीत सुचनेनुसार नवीन जॉबकार्ड (एक प्रत मजुरांकडे व दुसरी ग्रामपंचायतीकडे असावी)

३) मजुरीचे प्रदान व इतर तत्सम बाबींची नोंद वेळोवेळी MIS वर घेण्यात यावी.

४) सदर कामाचे सामाजिक अंकेक्षण स्थानिक मजुरांमार्फत राज्य शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार करण्यात यावे.

**ई) काम पुर्णत्वाचा दाखला व त्याबाबतच्या नोंदी**

क्रिडांगणाच्या कामांच्या अंदाजपत्रकास ज्या दर्जाच्या अधिकाऱ्याने तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे, त्याच दर्जाच्या अधिकाऱ्याने पूर्णत्वाचा दाखला दयावा. तसेच काम पूर्ण झाल्यावर सदर कामाची नोंद ग्राम पंचायतीमधील नमुना नं. १० मधील मत्ता नोंदवहीमध्ये नोंद घेण्यात यावी.

**उ) संनियंत्रण व अहवाल.**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत क्रिडांगणाच्या कामाची प्रगती व त्याचा दर्जा यांची जबाबदारी संबंधित जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांची असेल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१३०४१२१६५७१५०५१६ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

30/4/2013

**( आर. विमला )**
**उप सचिव (रोहयो) नियोजन विभाग**

**प्रत:-** मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मुख्य सचिवांचे स्वीय सहाय्यक,

अतिरिक्त मुख्य सचिव,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई.(प्रसिध्दीकरिता)
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी (बृहन्मुंबई वगळून),
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद
प्रधान मुख्य वन संरक्षक, नागपूर,
आयुक्त (कृषि) महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे,
संचालक, फलोत्पादन, पुणे,
संचालक, सामाजिक वनीकरण,पुणे,
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर,
सर्व मुख्य अभियंता व सह सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय, मुंबई,
सर्व मुख्य अभियंता व सह सचिव, जलसंपदा विभाग,मंत्रालय, मुंबई,
मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभाग,पुणे,
उप सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ रोजगार हमी समिती, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई,
कक्ष अधिकारी,संग्राम कक्ष,ग्राम. व जलसं. विभाग,मंत्रालय,मुंबई.(महाऑनलाईनवर प्रसिदधीसाठी)
सर्व जिल्हा अधीक्षक, कृषि अधिकारी,
सर्व उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, नियोजन विभाग (रोहयो),
निवडनस्ती-रोहयो-१